सातारा २ पुढारी बुधवार १३ जानेवारी २०१६



पुसेगाव येथील युवा महोत्सवात विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य लक्षवेधी ठरले.

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# युवा महोत्सवात तरुणाई थिरकली

खटाव : प्रतिनिधी

पुसेगाव येथील प.पू. सेवागिरी महाराजांच्या यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात जिल्ह्यातील महाविद्यालयीन तरुणाई थिरकली. हा महोत्सव पाहण्यासाठी श्रोत्यांनी गर्दी केली होती.

युवा महोत्सवात वाईच्या किसन वीर महाविद्यालयाने सादर केलेले गोंधळीनृत्य लक्षवेधी होते. तर साताराच्या छत्रपती शिवाजी कॉलेजने ऑनलाईन मोबाईलबाबत पथनाट्य सादर करुन प्रेक्षकांची वाहवा मिळवली. साताराच्या अरविंद गवळी कॉलेजने पाणी साक्षरतेवर पथनाट्य सादर करुन जनजागृती केली. फलटणच्या एस. जे. एन. एन. इन्स्टिट्यूटने समाजातील रुढी परंपरेबाबत पथनाट्य सादर केले. या महोत्सवामध्ये सुगम गायनामध्ये ८, समूहगीतामध्ये ७ पथनाट्यात १२, लोकनृत्यात १२, रेकॉर्ड डान्समध्ये ८ महाविद्यालयांनी सहभाग घेऊन या महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विसापूर येथील उद्योन्मुख गायिका प्रियांका कदम हिने सादर केलेल्या गीतांनी प्रेक्षक भारावून गेले.

प्रारंभी या महोत्सवाचे उद्घाटन पंढरपूर जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश उत्तमराव मुधोळकर यांच्या हस्ते व मठाधिपती सुंदरगिरी महाराज, अध्यक्ष डॉ. सुरेश जाधव, विश्वस्त मोहनराव जाधव, डॉ. प्र. ल. भुजबळ, शिवाजीराव जाधव, विजय जाधव, अॅड. विजयराव जाधव, सुनीलशेठ जाधव, प्रा. संजय क्षीरसागर, सुभाषराव जाधव आदि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी न्या. उत्तमराव मुधोळकर म्हणाले, युवा शक्तीने आपल्या बुद्धीमत्तेचा वापर कौशल्य विकासासाठी करावा. युवकांनी नोकरीच्या मागे न लागता कौशल्य वृद्धींगत करावे.

डॉ. सुरेश जाधव म्हणाले, या युवा महोत्सवातून समाज प्रबोधन घडवण्याचे काम व्हावे. या युवा महोत्सवात पथनाट्य स्पर्धेत साताराच्या छत्रपती शिवाजी कॉलेजने प्रथम, साताराच्या अरविंद गवळी इंजिनिअरिंग कॉलेजने द्वितीय तर फलटणच्या एस. जे. एन. एन. इन्स्टिट्यूट तृतीय क्रमांक मिळवला. लोकनृत्य स्पर्धेत वाईच्या किसन वीर महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळवला. समूहगीत स्पर्धेत फलटणच्या मुधोजी कॉलेजने प्रथम, साताराच्या डी. जी. कॉलेज ऑफ कॉमर्सने द्वितीय, वाईच्या किसन वीर महाविद्यालय व पुसेगावच्या आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेजने तृतीय व साताराच्या नॅशनल ग्रुपच्या बाल कलाकारांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. समूहगायन स्पर्धेत कोरेगावच्या डी. पी. भोसले कॉलेजने प्रथम, साताराच्या एल. बी. एस. कॉलेजने व साताराच्या डी. जी. कॉलेज ऑफ कॉमर्सने द्वितीय, पाटणच्या बी. डी. कॉलेजने तृतीय तर फलटणच्या मुधोजी कॉलेजने उत्तेजनार्थ बक्षीस मिळवले. रेकॉर्ड डान्स स्पर्धेत पुसेगावच्या हनुमानगिरी ज्युनिअर कॉलेजने प्रथम क्रमांक मिळवला. युवा महोत्सवात महाविद्यालयीन तरुणाईने सादर केलेल्या कलागुणांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली. श्री सेवागिरी कृषि प्रदर्शनाच्या व्यासपीठावर झालेला युवा महोत्सव पाहण्यासाठी यात्रेकरुंनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.